# यतिमहाराजांनी लिहिलेली व त्यांना आलेली पत्रे

## १) पूर्वाश्रमीचे यति महाराजांचे मंत्रगुरु. पू.धुंडीराज शास्त्री कवीश्वर- देऊळगांवराजा

श्री गणेश

श्रा.शु.८
गुरुवार शके१८८४.

श्री स्वानंदेश कृपापात्र परभक्तिसंपन्न तपोनिधि ब्रह्मश्री हरिदत्त ब्रह्मचारी महाराज सेवेशी धुंडिराज वक्रतुंड कवीश्वर यांचे सा.प्र.वि.वि.

आपण स्वत:कडे पुष्कळशी लीनता,कनिष्ठता स्वीकारली आहे. पण वस्तुत: आपण त्यागी ,तपोधन, ज्ञातज्ञेय श्रीशश्रेष्ठ भक्त आहात.यामुळे आपणापूढे मस्तक ठेंगण होते. तसे आपणास वंदन करून हे पत्र लिहीत आहे. आपले ता.६-८-६२ चे मंगळूरचे कृपापत्र (आंतरदेशिय पाकिट) हे काल सायंकाळी मला मिळाले, ते समग्र वाचून मनास परम आल्हाद झाला. बरेच दिवसानी आपले पत्र स्मरण मिळालेमुळे समाधान वाटले. आपले स्मरण नेहमी आम्हास होतेच. आपले कुशल कळून मनास बरे वाटले. पुणे येथील आपले चूलते डॉ.मार्तंडराव करमळकर यानी मजकडे २५रू. पंचवीस रुपये पाठविले. ते गुरुपौर्णिमेचे संधीस मला येथे मिळाले आहेत. तेरूपये पोचले बद्दल आपले चुलत्याना मी पाकीट पत्र पाठविले ते त्यानां पोचले असेल. त्यांत आपणास माझा नमस्कार कळविण्या विषयी लीहीले होते. आपण जें मला द्रव्य पाठविले. ते पुष्कळच आहे. आपले शुद्धप्रेम आहे. तरी इतक्या द्रव्याची आवश्यकता नव्हती. आपण पाठविलेले पैसे मी आनंदानें स्विकारले आहेत.हे मोठे सहाय्य मला आपले झाले आहे. आपल्या द्रव्याचा विनियोग प्रपंच व परमार्थ यात मी करीत आहे. मी गेल्यागुरुद्वादशीस नरसिंहवाडीस असताना आपले दर्शन मला झाले नंतर पुन: मी आपली भेट घेण्यास आलो होतो. पण आपण आचार्यांबरोबर कोल्हापूरी गेल्याचे कळले. मग मलाही इकडील प्रांतात कांही कामे व्यवधानाने होती म्हणून मी लवकर वाडीतून निघून इकडे आलो पुढे पौषात वा आजवर मी इकडेच आहे.





मधे चैत्रात श्री नारायणस्वामींच्या उत्सवासही मी गेलो नाही. त्यावेळी ची. दत्तात्रेय यासच वाडीत पाठविले होते. आपणास परमश्रेष्ठ साधुपुरूष प.प. श्रीधरस्वामी महाराज यांची सेवा सत्संगती चांगली लाभली हे आपुले परमभाग्य आहे. श्रीआचार्यांनी विवेकचुडामणी पुस्तकात लिहिले प्रमाणे महापुरूष संश्रय म्हणजेसाधूसंगती हा मानवजन्मात अत्यंत दुर्लभ आहे. व ती घडली की पुढील मार्ग भागवतधर्म वगैरे आपोआप मिळतात, ती सत्संगती ही मनुष्य जन्मात प्रथम गणनीय अशी आपणास मिळाली. अशी संगती ही ईशकृपेवाचून होत नाही. हे आपले म्हणणे फार यथार्थ खरे आहे.यास प्रमाण योगवाशिष्ठात वशिष्ठ वाक्य आहेच. साधु पुरूषाची संगती सेवा ही साधूंच्या आराग्य स्थितीतील विशेष गणनीय नाही पण ती तशी श्लाध्य असली तरी ही ती सेवा संगती साधूंच्या अनारोग्य स्थितीतील विशेष गणनीय प्रसंशनीय आहे. अशीच श्रेष्ठ सेवा रूग्ण स्थितीतील विशेष आपल्या गुरुंची-संताची मोठी केलेली हे वर्णन गुरुचरीत्रांत द्वितीय अध्यायात आहेच त्या साधू गुरुंची सेवा करणारा सेवक शिष्य याचेपुढे प्रत्यक्ष शिवविष्णु हे देव प्रसन्न होऊन आले व त्याला कृतकृत्य केले हे आपणास माहित आहेच. अशीच ही साधू गुरुंची सेवा त्यांच्याप्रकृतीचे अस्वास्थात तुम्हास पुष्कळ काळ घडली आहे. ही प्रभुजवळ अत्यंत रुजु आहे. या सेवेने ईशप्रसाद आपणास लाभून पूर्ण कृतकृत्यता पूर्णता आपणास मिळणेची आहे. चिंतेचे कारण नांही. रुग्ण स्थितीतील गुरुची सेवा म्हणजे तो शिष्याची परिक्षेचा काल आहे.याच सेवेत तो उतिर्ण झाला पाहिजे ते मिळणारे आहे. असो. श्री श्रीधर स्वामी महाराजानां आता बरे वाटते,त्यांची प्रकृती चांगली झाली हे वाचून फार आनंद वाटला. ठीक झाले. आमचीही ईश्वराजवळ प्रार्थना त्यांच्या आरोग्य प्राप्ती करता होती. ठीक झाले. आपली ईशमंगलमूर्तिची उपासना आहे व त्या योगे निविघ्न असे सर्व मनाप्रमाणे घडत आहे हे खरेआहे. ब्रह्मवेत्यासह त्याचे जवळ राहणे हे अत्यंत उपकारक परमार्थास आहे. हे आचार्य वाक्य थोर सत्य आहे. आता आमचेजवळ कांही काळ काढावा असे आपली प्रार्थना समजली. पण सत्संगती म्हणून जी अभिप्रेत आहे ती तुम्हास होणे ऐवजी मलाच ती सत्संगती तुमचे सान्निध्याने होणारी आहे. असे सत्संगतीरूप तुमचे सान्निध्य मलाही इष्ट असेच आहे.बाकी माझे सन्निध्यानें आपणास कोणता लाभ होणार? मी संसार कीटक आसक्त पुरूष आहे.सुखदु:ख आदि द्वंद्वाचे परिणाम मजवर नेहमी होतात. नफा नुकसानी पासून होणारे हर्ष ,विषाद विकारांनी अंत:करण हे नेहमी संपृक्त असते त्याग नाही कामक्रोधादि आसुरी संपत्तीने मला सोडले नाही. लोभ जागरूक असुन त्यामूळेच

चोहोकडे फिरतो. विद्या अल्प वगैरे अशा कारणामुळे सर्वसाधारण जीव वर्गाप्रमाणे मी एक जीव आहे. ईशोपासनाही घडत नाही.सर्व ठीक होणेस आपल्या त्याग शम दम तप उपासना वगैरे गुणाकडे आम्ही पाहिले पाहिजे व आपल्या आर्दशाचा उपदेश हा नेहमी आम्ही घेतला पाहिजे. श्री सदुरुउपासना असलेली तीच मंत्राक्षरे आपणास दिली. यात विशेष असे कांहिच केले नाही आपण क्षमा मागितली पण जेथे अपराध चूकच नाही तेथे क्षमेचा प्रश्नच उरत नाही. आपण ह्या सिद्धगणेश मंत्राची उपासना,पुन:श्चरणादि करावे.आपणास लवकर सिद्धि मिळेल कारण मुळचीच सिद्धता आपणाजवळ आहे. माझे अक्षर बरे नाही सुधारून वाचावे कृपा कीजे हि विनंती.

चरणरज

धुं.व.कवीश्वर वाडीकर.

❋ ❋ ❋

## २) देऊळगांवराजा

श्रीगणेश

आश्विन व.धनत्रयोदशी

शके १८९४ शुक्रवार.

ब्रह्मश्रीयुत: ज्ञानविज्ञानसंपन्न ब्रह्मविद्वरीयान सकलदैवीसंपत्समायुक्त श्री मंगलमूर्ति कृपाप्रसादानंद महाराज प.प. यति श्री यति नारायणानंद मस्करींद्र श्रीचे चरणसेवेदि दास धुंडीराज कवीश्वर याचे भक्तिपेमान्वित साष्टांग प्रणिपात विज्ञप्ति विशेष.

सर्वक्षेम श्रींजींचे पत्र उगारखुर्दहून देऊळगांवी आले. ते पत्र मला मिळणेस बराच विलंब लागला कारण मी परगावी जालना वगैरेकडे होतो. आता आपले पत्र मिळूनही कांही काल गेला. कारण मी प्रकृतीने बरानाहीं.ब्लडप्रेशर व गुडघेदुखणे संधिवात मुत्रविकार अशक्तता वगैरेने मी बेजार आहे. वयोमान ८७वर्ष चालू आहे. आपणास पत्र लिहीणेस विलंब झाला यामुळे मन खट्टू झाले आहे.बरे वाटत नाही. ज्ञाताज्ञातानू मे ऽपराधान् क्षमस्व- या उक्तीने क्षमापत्र विनंती करीत आहे.क्षमा असावी आपण क्षमा दया सागर आहात कृपया..आहे. असौ आपले पत्र आषाढ शुद्धातील आलेले वाचून इतका महान आनंद झाला की त्याचे वर्णन होत नाही.आपले स्मरण मला नेहमी होते. त्यात आपल्या पत्राने प्रत्यक्ष दर्शनाचा महान आनंद झाला आहे. हे मोठे भाग्य मी समजतो,आपला सहवास संभाषण वगैरेचे पूर्विचे संस्मरण झाले.फारच समाधान वाटले.मी तूर्त डॉक्टर वैद्य यांचे





उपचार औषधी घेत आहे.प्रकृतीस कमी अधिकपणा होतो. ईशच्छेने सर्व चालू आहे. सर्व व्यवस्था बरी आहे. पुणे येथे श्री वासुदेवनिवासात आपली भेट दर्शन झाले होते. त्यावेळी गडबड होती. त्या दर्शनाने मोक्षआनंद झाला होता. आपल्या कुर्मकृपादृष्टिने आमचेसंरक्षण होते. पत्रानेतर विशेष, वास्तविक आम्हिच आपणाकडे पत्र पाठवून आपले कुशलं वगैरे सर्व जाणून घेतले पाहीजे. आपणास पूर्वाश्रमीचे सर्व स्मरण झाले व त्यामुळे कृपायुक्त अंत:करणाने प्रेरित होऊन मजकडे आपल्या दर्शनाचायोग जरी अवघड आहे ती तो घडावा अशी तीव्र मनीषा आहे. पाहू केंव्हा तो सुयोग येईल तो आपणास श्री गणेश उपास्य देवतेचे कृपेने जो ज्ञानानंद लाभत आहे त्यास मुख्य कारण म्हणजे आपली ईश भक्ती हेंच एक आहे.इतर श्रवण मननादीक वगैरे ही दुय्यम प्रतिची साधने आहेत, अभियुक्तांची वचने आहेत ती -भक्तिर्जनित्री ज्ञानस्य- यथा ज्ञानं विना मुक्तिर्नासमुपाय शतैरपि.-तथा भक्ति विना ज्ञानं नास्त्युपाय शतैरपि- भक्त्या मा मभि जानाति यावान यश्चास्मी तत्वत:(गीता).यानन्नवानुग्रह:साक्षात् जायते परमेश्वर: तावन्न सद्गुरु कश्चित् सच्छास्त्र मतिनो लभेत्(योगवाशिष्ठ) भक्ति ही ज्ञान साधन प्रमुख असले विषयीची आहेत. तसेच भागवत एकादश स्कंध प्रथम पंचाध्याईत निमिजनमेजय याचा संवाद आहे. त्यात जायते यान्सतमेचे संभाषणात: भक्तिहे ज्ञानमुक्ती साधनाआहे असे स्पष्ट आहे. असो शिवाय आपल परमार्थसाधना विषयीचा जो निश्चय प्रथम पासूनच आहे ते परमवैराग्य युक्त असा खडतर पूर्वाश्रमातूनच असल्यानें त्याग निश्चय व तीव्र जिज्ञासेचे बलानें ही आपणास तूर्तचा ज्ञानानंद लाभत आहे. निश्चयाचे बळ तुका म्हणे तेची फळ. असो एकदा की थोडे दिवसापूर्वि पुणेस असताना तेथे आपले बंधू डॉ यांनी मला स्वत:चे घरी भक्ती प्रेमाने नेले होते. त्यांचे घरी माझे जेवणही झाले बंधूनी माझा आदरसत्कारही केला.आपले बंधू मोठे धार्मिक व ईशभक्ति विनयसंपन्न योग्य आहेत. इष्ट देवतेचे कृपेने सर्व साधने उत्तम चालतात. त्याचे फलही प्रत्यक्ष अनुभवण्यास मिळते. आपली ब्रह्मसूत्र भाष्यांची पारायणे चालू आहेत. यात शंका नाही ही पारायणे आपली चालू ठेवावीत. याचे योग्य ज्ञानफल मिळेल पारायण चालू असताना पद वाक्यांचे अर्थाकडे लक्ष असावे व तसे ग्रंथ वाक्य ज्ञानाचा अधिकार आपला आहेच यात शंका नाही हे सर्व आपण करीत आहात.पण मी अरूप समजुतीने लिहीत आहे. बालादपि सुभाषितम् गाह्यं या आपल्या पारायणानुष्ठानाने आपली ज्ञान समृद्धी जरूर होईल. हेफार चांगले आपले चालू आहे. शिवाय ग्रंथात असे आढळते की नुस्ते-अहं ब्रह्मास्मी- असे सतत म्हणण्यानेही ब्रह्मज्ञान प्राप्त होते. मग अर्थ ज्ञान नसले तरी चालते तसेच या भाष्य पारायणाने आपली चित्त प्रसन्नता शांतता वगैरे आपणास

लाभली आहे. श्रृती वाक्ये भाष्य वाक्ये आपले ध्यानात राहतात हा परिणाम लहान नाही.आपली विषय ग्रहण शक्तिही वाढली आहे. सिद्धांत मुरणे वगैरे सर्व ठीक असे झालेले आहे.याचापरिणाम आपण पूर्ण ज्ञानविज्ञान संपन्न होऊन ईश प्रसादाने सप्तमी तुरिया भूमिकेचे ठिकाणी लवकरच आरूढ होणार असा विश्वास वाटतो. हा आपला तूर्तचा जो योग आहे तो एकाच जन्मातला नसून पूर्वजन्मातील व अभ्यासाचा आहे. तो आता पूर्ण होत आहे. अनेक जन्म संसिद्ध: ततो याति परांगतिम। यततामपि सिद्धानां कश्चिनन्मांवेती तत्वत: इत्यादि वाक्ये वरील म्हणणेस पोषक आहेत. वे.भालचंद्रशास्त्री धारवाड हे फार योग्य अधिकारी पंडीत आहेत, श्रीमंगलमूर्तिच्या कृपेने सर्व मनिषा आपल्या पूर्ण होतील.श्रीमद्‌आचार्यांच्या शिष्य तोटक मूढ परंतु त्याही शिष्याने मंडनमीश्रासारख्या महान अधिकारी आचार्य शिष्यानाही श्री गुरुकृपेने भाष्यांचे पाठ सांगितले आहेत. आपण तर अधिकारी पुरुष आहात व ईश सद्‌गुरु कृपा आपणावर आहेच चिंतेचे कारण नाही. आपले सर्व मनोरथ मंगलमूर्तिचे कृपेने पूर्ण होतील आपला काशीचा निवास या बद्दल बापूसाहेब पाटील सूर्डीकर यांनी सांगीतले.फार आनंद वाटला. आता उगारहून प्रयाण कुणीकडे ते समजावे. आमचा चिरंजीव दत्ता हा परवा येथे येऊन भागवत मूळ वाचून पुणे वाडीकडे गेला. असो बाकी सर्व ठीक आहे मी तूर्त देऊळगांवीच आहे. श्रम होत नाहीत. आपले शरीर आरोग्य उत्तम असो. पारमार्थिक लाभास जे श्रम आचार आहेत ते सर्व होणेस आंतर्बाह्य बलशक्ती आरोग्य यांची आवश्यकता असते. असो, आपल्या इच्छामात्रेकरून आम्ही सुखी आनंदी राहू पूर्ण कृपा प्रसाद असावा ही नम्र विज्ञाप्ती,

**आपला चरणरज**

***-धुंडिराज वक्रतुंड कवीश्वर वाडीकर.***

❋ ❋ ❋





### ३) प.प.यति महाराजांनाज्यानी प्रस्थान त्रयी समजाऊन सांगीतली ते ब्रह्मश्री पू दत्तमहाराज कविश्वर यांचे पत्र.

श्री दत्त

इचलकरंजी
कार्तिक शु.१२
भृगुवार १९११.

श्री प.प. योगत्रय,प्रशांतचित्त श्री नारायणानंद सरस्वती स्वामी महाराज यांचे पवित्र चरणकमल सन्निधि साष्टांग वंदनपूर्वक विज्ञापना वि.

श्री शिरटीकर चातुमास्य समाप्तीस आपणाकडे येत असल्याने त्यांचे जवळ हे उत्कंठा-प्रार्थना पत्र,मूलाधार परमात्मस्मरण पूर्वक लिहून देत आहे. या प्रार्थनेचे साफल्य तत्स्वरूप आपल्याच कृपाकूर्म दृष्टिने होणार आहे.

श्रीमोक्षगुरुंनी बालवयात धारवाडला शिकत असतानां वाराणसीहून पत्ररूपाने संकल्पादेश दिला,त्याचा आशय-विद्याभ्यास चांगला करून प्रस्थानत्रयीचा अभ्यास चांगला करावा. पुढे त्याचे श्रवण व पूराण आम्हाला अमरापूरी अमलेश्वर दत्तगुरुसन्निध करवावे पुढे प्रपंच करून परमार्थ लाभही संपादन करावा. हे सर्वही उपास्य देवता, श्रीगणपति श्रीदत्त श्रीगुरुमहाराजांचे कृपेनेच व्हावयाचे आहे. -नारायण.

असा आशय त्यापत्रादेशाचा आहे. हे पत्र पाहून चित्तातील तळमळ शांत होऊन वैयक्तिक ध्येय व तत्पुर्तीबद्दलचे आश्वासन समजून आल्याने चित्त शांत झाले. पण अद्यापि प्रपंचासक्ति सुटत नसल्याने ही ध्येयपूर्ति या जन्मी का पूढील जन्मी हा संदेह निर्माण होऊन चित्त व्याकुलीभाव पुन: निर्माण झाला.

प्रति चातुर्मास्यामध्ये श्रीदिवेकर,श्री शिरटीकर प्रभृति बहूत सुकृताची जोडी आपण हे सज्जन साधकानां आपल्या-आत्मज्ञानये प्रयता संपादक पवित्र संगतीचा व सच्छास्त्र श्रवणाचा लाभ आपल्या कृपेने होतो. तसाही लाभ स्वीय दूरदृष्टिने अंतराय ग्रस्त,मायाबुद्धि निमग्न या जीवाला आजपर्यंत झाला नाही. तसे घडले तरी अंशत:तरी सद्‌गुरुंच्या आज्ञेचे पालन घडल्याचे समाधान लाभून इहलोक त्यागसमयी काही तरी लाभेल, पण हे सर्व -हृदिबुद्धिप्रदातृत्वाद् बहि:सिद्धी प्रदत्वत:- अशा सर्व समर्थ श्रीसिद्धिबुद्धि पतीच्या इच्छेवरच अवलंबून असणार, तथापि आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा- या श्रीतुकारामाच्या प्रार्थनेप्रमाणे हे सर्व घडून येणारे आहे वयाला ऐंशी वर्षे होत

आली पण हे सर्व आयष्य-निद्रया न्हियते नक्तं दिवा चार्थेह्या तथा- या श्री प्रल्हादजींच्या उक्तीप्रमाणे व्यर्थ गेलेआहे. पश्चिमेकडे रथ चालला आहे तो कोठे केव्हा थांबणार हे समजत नाही. असा नैराश्यात्मक व्याकुलीभाव या पत्ररूपाने आपल्यापूढे मांडला आहे. इत:पर आत्माराम: आप्तकाम: श्रीचरणा एव परमं प्रमाणर्मिति विश्वस्य विरमांमि तावत् -नान्तो न चादिर्नच संप्रतिष्ठा- इति श्रीभगवदुपवर्णित निरवधि स्वकर्म सूत्र ग्रथित:अघन्यजीव व्यापार लेखनादिति.

-कृपाकटाक्षाभिलाषी-

***शिष्य परमाणु: - कविश्वरकुल जनुर्दत्तात्रेय शर्मा.***

❊ ❊ ❊

## ४) योग वाशिष्ठ-प.प.यतिमहाराजांचे पत्र. १०-३-८९.

**श्री राम उवाच॥**
**जीवन्मुक्तशरीराणां कथं आत्मविदां वर।**
**शक्तयोर्नेह दृश्यंते आकाशगमनादिकम्॥**

श्री राम म्हणाले. जीवन्मुक्त आत्मज्ञानी अशा माणसांच्यामध्ये शक्य असताना सुद्धा आकाशातून भ्रमणासारखे दिव्य संचार का दिसत नाहीत?

**वशिष्ठ उवाच-**
**आनात्मविद्मुक्ताऽपि नभोविहरणादिकम्।द्रव्यमंत्र क्रियाकाल शक्त्यान्योत्येव राघव॥**

वशिष्ठ म्हणाले-आकाशात संचारासारखे कार्यक्रम द्रव्य मंत्र क्रिया व काल इत्यादींच्या शक्तीच्या प्रभावामुळे आत्मज्ञान नसणारा अमुक्तसुद्धा सहज मिळवू शकतो.

**नात्मज्ञस्येषविषय आत्मज्ञो ह्यात्मदृक्स्वयम्।**
**आत्मनात्मनि संह्रप्तो नाविद्यामनुधावति॥**

हा सगळाविषय आत्मज्ञान नसलेल्याचा आहे आत्मज्ञ हा आत्मदृक् असतो तो आपणच आपल्यांत तृप्त असतो तो ह्या अविद्येच्या मागे लागत नाही.

**आप्मवानिहसर्वस्मादतीतो विगतैषण:।**
**आत्मन्येवहि सन्तुष्टो न करोति न चेहते॥**

आत्मज्ञानी या सगळ्या गोष्टींच्या अतीत असतो, त्याच्यासगळ्या(एषणा)इच्छा





तृप्त असतात तो आपण आपल्यातच संतुष्ट असतो तो असल्यागोष्टी स्वत: करत नांही व त्याघडाव्या अशा आशाही बाळगत नाही.

**येकेचनजगद्भावास्तनविद्यामयान्विदु: ।**
**कथं तेषु किलात्मज्ञस्त्यक्ताविद्योनिमज्जति॥**

ज्याना या संसारातले जगातले सगळे खरे वाटणारे भावच अविद्यामय वाटतात अशा भावामध्ये तो आत्मज्ञ ज्यात प्रयत्नात अविद्येचा त्याग केला आहे तो.

**तत: परेऽश्विने मासे कस्मिंश्चिन्नगरेऽथवा।**
**अपरिचितग्रामे व स्थास्याम्येकान्तवांछया॥**

ह्यानंतर येणाऱ्याअश्विनामध्ये एखाद्या अपरिचित ग्रामामध्ये अगर नगरामध्ये एकान्तवासाच्या इच्छेनेराहीन.

**अनित्ये व्यवहारेऽस्मिन्नचित्तं रमतेऽधुना।**
**सर्वदान्तर्मुखोभूत्वा निदिध्यासनतत्परा:॥**

आता माझे मन ह्यासगळ्या अनित्य व्यवहारामध्ये रमत नाही.मी अन्तर्मुखहोऊन निदिध्यासन तत्पर झालेलो आहे.

**आत्मचिन्तनूयुक्तोऽहं कृत्वा चान्यस्यर्कणम् ।**
**कथास्यास्मांमिहेकान्ते तीव्रेच्छावर्तते खलु॥**

मी आता आत्मचिंतनयुक्त झालोआहे दुसऱ्याच कर्म मी आता कथाकादंबरीतल्या सारख मानतो. आता मला एकान्ताची तीव्र इच्छा झाली आहे.

**अताऽन्यदाति श्रुत्युक्त मानस्य सर्वस्यबाधनात् ।**
**एतदेवहि कर्तव्यं यतिभि: मोक्षकांक्षिभि:॥**

श्रुतीत सांगितलेली आणखीनएक गंमत आहे. म्हणजे या सर्व भावभावांचा निरास करून त्यांच्या बंधनात न राहता आत्मज्ञानी माणसाने हेच (मी वर सांगीतलेले कर्म) करायचेअसते.

**ज्ञानस्य परिकार्यं संन्यास इति वाक्यत: ।**
**उक्तं श्रीपुज्यपादैश्च कल्याणाय तदेवही॥**

ज्ञानाचा खराखुरा परिणाम म्हणजे संन्यास असे पुज्यपादांनी म्हटलेले असल्याने मी तेच कल्याण करत राहणार आहेत.

❊ ❊ ❊